दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२६८ | रविवार,दि.०१ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-268 | Sunday, Dt.01 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीड जि.प.च्या बदनामीस कारणीभूत ठरत असलेल्या शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे ची अखेर अमरावतीस हकालपट्टी :: भगवान फुलारींच काय.....??

## वादग्रस्त शिक्षणाधिकारी सांभाळण्यात सीईओ यांना रस का होता......??

**(सुनील सिरसाट)-- विविध अनुषंगाने नेहमीच वादग्रस्त ठरलेल्या आणि सातत्याने बीड जिल्हा परिषदेच्या बदनामीस कारणीभूत ठरत असणाऱ्या शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्यात सीईओ यांना एवढा रस का होता......??**

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यातील विविध पंचायत समितींमध्ये गटशिक्षणाधिकारी म्हणून काम केलेले नागनाथ शिंदे यांच्याकडे माध्यमिक विभागाचा चार्ज देऊन हातानेच आ बैल मुझे मार उक्तीप्रमाणे सीईओ अविनाश पाठक यांना इतका रस का होता हे त्यांनाच ठाऊक. परंतु त्यानंतरही नव्याने तरुण तडफदार आलेले आदित्य जीवने यांनाही या वादग्रस्त शिंदेंमध्ये नेमका का एवढा असा रस होता त्याचे उत्तर जिल्हावाशी मागत असतानाच अखेर नागनाथ शिंदे यांची अमरावती येथे बदली स्वरूपात हकालपट्टी केली. हाता खालच्या कुडके नामक क्लार्क कडे एवढे मोठे अवैध रकमेचा साठा सापडला तेंव्हाही त्या प्रकरणात शिंदेंचा कितपत संबंध याची यत्किंचितही चौकशी न करता तत्कालीन सीईओ अविनाश पाठक हेच बीडचे जिल्हाधिकारी झाले तरीही शिंदे यांच्या बाबतीत कुठलीच ठोस कारवाई न झाल्याने प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांचीही हिम्मत वाढली आणि मग या हैबत-गैबत च्या जोडीने जिल्ह्याचा प्राथमिक-माध्यमिक शिक्षण विभाग अगदी झोडपून-खुडून खायला चालू केला अशीच ओरड जिल्हाभर ऐकावयास मिळत होती. विविध स्तरातील विविध तक्रारदारांकडून नागनाथ शिंदे यांच्या बाबतीत असंख्य तक्रारी




असताना त्यांचे काहीच झाले नाही, तर माझे तरी काय होणार......? या मानसिकतेतून अलीकडे भगवान फुलारी यांच्याही बाबतीत तक्रारींमध्ये वाढ झाली असून दोघांविरुद्धच्याही तक्रारींचा निपटारा ना जिल्हास्तरावर होताना दिसला ना विभागीय स्तरावर. यामुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागातील सर्वसामान्य कर्मचारी-शिक्षक यांच्यासह शिक्षण विभागाशी संबंधित सर्वच मंडळी मोठी त्रस्त झालेली असून या जोडीचा एवढा लाड कशामुळे केला जातोय आणि एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षण विभागासह बीड जिल्हा परिषद बदनाम होत असताना अशा वादग्रस्त शिक्षणाधिकाऱ्यांची हकालपट्टी का होत नाही अशी मागणी आता जोर धरू लागली असतानाच अखेर नागनाथ शिंदेंच्या माध्यमातून शिक्षण विभागाच्या तोंडाला आणखीन काळे लागेल अशा भितीने

(उर्वरीत पान २ वर)



## मराठवाड्यास पश्चिम महाराष्ट्राच्या सिंचनाची बरोबरी साधण्यासाठी

## पुढील पंधरा वर्षात ३० हजार कोटींची गरज - नितीन पाटील खोडेगावकर

प्रतिनिधी @ बीड

कोणत्याही देशाची प्रगती पाण्या शिवाय होऊच शकत नाही मराठवाड्यावर निसर्गासोबतच शासनकर्त्यांनी ही कायम अन्याय केल्याने मराठवाड्याला 'दुष्काळवाडा' 'टँकरवाडा'अशा नावांनी ओळखले जाते. मराठवाड्यातील ७६ पैकी ५३ तालुके (७० टक्के ) कमी पावसाच्या क्षेत्रात मोडतात.महाराष्ट्रातील विद्यमान अपूर्ण प्रकल्पांचा अभ्यास केला तर सर्व कामे पुढील दहा वर्षात पूर्ण झाल्यास उर्वरित महाराष्ट्राची सिंचन क्षमता ४१ टक्के आणि विदर्भाची ३९ टक्यापर्यंत पोहोचेल. मराठवाड्यातील उपलब्ध पाणी आणि उर्वरित प्रकल्प पाहता सर्वात कमी केवळ २५ टक्के सिचंनापर्यंत पोहोचू शकते. उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचनाची बरोबरी करण्यासाठी मराठवाड्यासाठी इतर पाणी समृद्ध क्षेत्रातूनच १५० टीएमसी पाणी आयात करावे लागेल. त्यासाठी नवीन सिंचन प्रकल्प प्रस्तावित करावे लागतील. ही प्रकल्प करण्यासाठी सुमारे ३० हजार कोटी रुपयांची आवश्यकता असेल. अशी माहिती जलतज्ञ नितीन पाटील खोडेगावकर यांनी दिली.



कमी पर्जन्यमानामुळे मराठवाड्यातील जनतेला दुष्काळाचा सामना करावा लागतो.दरवर्षी डिसेंबर नंतर पिण्याच्या पाण्याचे स्रोत कोरडे पडतात.यामुळे २०१९ पर्यंत मराठवाड्यातील शेकडो गावातील जनतेला जानेवारी ते जुनपर्यंत ४ ते ५ हजार टँकरद्वारे

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5






## संपादकीय

# पारदर्शक कारभार कुठे आहे?

राज्यात, महापालिकेत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता कुणाचीही असली तरी विकासाची आणि दुरुस्ती-देखभालीची कामे ठेकेदारांना देणारी यंत्रणा तीच असते. सरकार बदलले किंवा महापालिकेतील सत्ताधारी बदलले तरी संवेदनशील खात्यातील अधिकारी, कर्मचारी, अगदी कारकून-शिपायापर्यंत स्टाफ वर्षानुवर्षे त्याच जागी असतो. कोणते काम कुणाला द्यायचे याची मोठी साखळी असते. राजकारणी, अधिकारी, ठेकेदार यांचे हितसंबंध ही साखळी जपत असते. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई महानगराची वाताहत होते. मुंबईची तुंबई होते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे कामात होणारा भ्रष्टाचार आणि टक्केवारी आहे. जोपर्यंत देवघेव संस्कृती संपुष्टात येणार नाही तोपर्यंत नालेसफाई किंवा कचरा सफाईवर हजारो कोटी खर्च केले तरी मुंबईची तुंबईपासून सुटका होणार नाही.

दि. २६ मे रोजी पहाटेपासून जोरदार पावसाने मुंबई महानगर प्रदेशावर आकांडतांडव केल्यानंतर देशाची आर्थिक राजधानी जवळपास ठप्प झाली. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईचे जीवन विस्कळीत झाले. सखल भाग, रस्ते आणि रेल्वे मार्ग पाण्याखाली गेल्याने उपनगरी रेल्वे, बेस्ट बसेस, मेट्रो रेल्वेने माना टाकल्या. जोरदार पावसाने मुंबई बंद होणे किंवा विस्कळीत होणे हे काही मुंबईकरांना नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात साधारणपणे जुलै महिन्यात पावसाने मुंबईत हाहाकार होतो. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईकरांना गुडघाभर पाण्यातून चालावे लागते. दरवर्षी पाणी साचण्याची ठिकाणे वाढत आहेत. दरवर्षी नालेसफाईची बोंब आहे. दरवर्षी रस्त्यावरील कचरापेट्या साफ=होत नाहीत हाच अनुभव आहे. दरवर्षी पदपथ व रस्त्यावरील अतिक्रमणे वाढतच आहेत.

मुंबईला नागरी सेवा देण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर आहे. देशातील सर्वांत श्रीमंत महापालिका असा तिचा लौकिक आहे. यावर्षी मुंबई महापालिकेचे बजेट ७२ हजार कोटी आहे. म्हणूनच मुंबई महापालिकेवर आपली सत्ता असावी. महापालिकेवर आपले वर्चस्व असावे असे प्रत्येक राजकीय पक्षाला वाटते. मुंबईची सेवा करण्यासाठी किती जण निवडणुका लढवतात हा एक अभ्यासाचा विषय आहे. पण निवडून आल्यानंतर नगरसेवकांची कशी भरभराट होते हे मतदारांना बघायला मिळते. मुंबईत आमदारांपेक्षा नगरसेवकाला जास्त महत्त्व असते. कारण महापालिकेच्या स्थानिक कामांमध्ये त्याच्या शिफारसीला महत्त्व असते. नगरसेवक कसे झटपट गडगंज होतात, हे जनतेला समजते.

महापालिकेबरोबरच नगरविकास, महसूल ही खाती मध्यस्थांनी नेहमीच वेढलेली असतात. मुंबई महापालिका, म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए (मुंबई महानगर विकास प्राधिकरण), सिडको, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम अशा डझनभर यंत्रणांना मुंबईत मोठे महत्त्व आहे. त्यावर नेमणुका, बदल्या व बढत्यांसाठी काय काय करावे लागते याचे भरपूर किस्से ऐकायला मिळतात. या सर्व यंत्रणांवर राज्याच्या प्रशासकीय मुख्यालयातून म्हणजेच मंत्रालयातून थेट नियंत्रण असते. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेची निवडणूकच झालेली नाही. राज्यातील सर्व महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक किंवा आयुक्तांमार्फत कारभार चालू आहे. अनेक महापालिका, पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार ते पाच वर्षे झाल्या नसल्याने राजकीय पक्षांचे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. राज्यकर्ते मात्र खूश आहेत. थेट मंत्रालयातूनच सर्व महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू असल्याने त्यात नगरसेवकांचा कुठेही वाटा नसतो.

दि. २६ मे रोजी मुसळधार पावसाने मुंबईची तुंबई झाली, तेव्हा देशाची राजधानी असलेल्या महानगराची दरवर्षी तुंबई होण्यास जबाबदार कोण? या प्रश्नावर माध्यमातून चर्चा झाली. तेव्हा भ्रष्टाचार हेच उत्तर अनेकांकडून ऐकायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील एका बड्या माध्यम समूहाला दिलेल्या सविस्तर मुलाखतीत राजकारणाचे अवमूल्यन झाल्याचे मान्य केले आहे. तसेच मुंबई महापालिका कारभारात होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत चिंताही व्यक्त केली आहे. प्रशासनातील भ्रष्टाचार आपण खपवून घेणार नाही, असा सज्जड दमही दिला आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेवर प्रशासकीय कारभार आहे. महापालिकेवर थेट नियंत्रण मंत्रालयातूनच आहे. मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या शिवसेनेची पंचवीस वर्षे सत्ता होती, तेव्हापासून चालू असलेला भ्रष्टाचार आजही चालूच आहे. भ्रष्टाचार, टक्केवारी आणि घोटाळे हा मुंबई महापालिकेला लागलेला शाप आहे. मुंबई महापालिका शापमुक्त कधी होणार हा कळीचा मुद्दा आहे.



बीड - झमझम शीतपेय फॅक्टरी मध्ये चार बालकामगारांची सुटका करण्यात आली. सदरील बालकामगार हे उत्तर प्रदेश मधील आहेत. शहर पोलीस ठाणे व विशेष असंघटित कामगार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यवाही करण्यात आली.

पान १ वरून...

**मराठवाड्यास पश्चिम महाराष्ट्राच्या ...**

पाणीपुरवठा करावा लागला होता. मात्र गेली दोन-तीन वर्ष मुबलक पाऊस होत असल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाईच्या झळा सध्या जाणवत नाही. असे असले तरी परिस्थिती केवळ लहरी निसर्गावर अवलंबून आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मराठवाड्याला कायमस्वरूपी पाण्याची गरज आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या समृद्ध पाणी क्षेत्रातून सुमारे १५० टीएमसी पाणी मराठवाड्यात आयात करून आणावे लागेल. '५६ लाख हेक्टरसाठी केवळ ८ टक्के पाणी' सिंचनाच्या बाबतीत मराठवाड्याची उर्वरित महाराष्ट्र आणि विदर्भ या विभागाची तुलना केली तर मराठवाड्यावर मागील ६२ वर्षात कायम अन्याय होत असल्याचे दिसते. परिणामी मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष वाढतच आहे. पश्चिम आणी उत्तर महाराष्ट्रातील पेरणीलायक ९७.६० लाख हेक्टर जमीनीच्या सिंचनासाठी ७४ टक्के पाणी उपलब्ध आहे. तर विदर्भातील ५६.७४ लाख हेक्टर (२७ टक्के) क्षेत्रासाठी १८ टक्के पाणी उपलब्ध आहे. मराठवाड्यातील ५६.२८ लाख हेक्टर (२७ टक्के) क्षेत्रासाठी केवळ ८ टक्के पाणी उपलब्ध आहे. 'राज्यात निर्माण झालेली सिचंन क्षमता' आणी (कंसात २०३५ पर्यंत टक्केवारी) उर्वरित मराठवाडा-३० टक्के (४१.८ टक्के )विदर्भ-२३.२(३९.१ टक्के),मराठवाडा २०.९ टक्के (२५.६ टक्के), दबावतंत्राचा बळी पिण्याच्या पाण्यासोबतच सिचंनाच्या बाबतीतही मराठवाडा अन्य प्रांताच्या तुलनेत पिछाडीवर केवळ राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींची उदासीनता आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या दबाव तंत्राचे राजकारण यास प्रमुख कारणीभूत असल्याचे बोलले जाते.( आगामी दहा वर्षात मराठवाड्यातील जास्तीत जास्त २५ टक्केच क्षेत्र सिंचनाखाली येईल) (यासाठी नदीजोड प्रकल्प हाच एकमेव पर्याय असल्याचे जलतज्ञ सांगतात) परंतु नदीजोड प्रकल्पाचे पाणी मराठवाड्याला मिळण्यासाठी वर्षानुवर्षे वाट पहावी लागत आहे नदीजोड प्रकल्पाचे पाणी मराठवाड्याला कसे मिळणार याचे तांत्रिक विश्लेषण अद्याप स्पष्ट नाही तरी मायबाप सरकारने मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी तातडीने अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

**बीड जि.प.च्या बदनामीस ...**

बदलीच्या नावाखाली शासनाने शिंदेंची हकालपट्टी केली आहे. परंतु ढवळ्या शेजारी पौळ्या बांधला आन वाण नाही पर गुण लागला या उक्तीप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनाही शिंदेंसारखे डोहाळे लागले असल्याची चर्चाही जिल्ह्यात जोरदार सुरू असल्याने शिंदे हाकलले मग फुलारी का नाही अशीही चर्चा जिल्हाभर सुरू आहे. तेंव्हा मोहरक्याची तर झालीय आता बारक्याचीही होईल अशीही चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. तेंव्हा खरच शिंदे हाकलले तसे फुलारी हाकलून शिक्षण विभागाची बदनामी थांबवली जाणार का की कारवाई एवढ्यावरच थांबणार हे पाहणे आता औस्तुक्याचे आहे.....!

# जिल्ह्यातील ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड वीज मीटर बसविण्यात येऊ नये ;- अनिल बोर्डे

**प्रतिनिधी** @ गेवराई

बीड जिल्ह्यात स्मार्ट मिटर बसविण्यास या जिल्ह्यातील सर्व ग्राहकाचा विरोध निदर्शनास येत आहे. बीड जिल्ह्यात स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्यात येऊ नये याबाबत यापूर्वी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा गेवराई पंचायत मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी मा. उपकार्यकारी अभियंता श्री मोरे साहेब यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली आहे.



या योजनेस बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांचा/ ग्राहकाचा प्रीपेड विज मीटर बसविण्यास विरोध निदर्शनास येत आहे. वीज ही अत्यावश्यक बाब आहे. ग्राहक म्हणून विजेचा पुरवठा केला जातो. परंतु स्मार्ट मीटर मुळे ही विक्रीची वस्तू ( कमोडिटी) होणार आहे. ग्राहक ग्राहक न राहता उपभोक्ता वा खरेदीदार ( कस्टमर) होणार आहे. विज क्षेत्रातील सुधारणा या नावाखाली आणि ग्राहक हिताच्या गोंडस नावाखाली खाजगीकरणाकडे वाटचाल निदर्शनास येत आहे. सर्वसामान्य ग्राहकांना दरमहा १०० ते ३०० च्या आत विज वापरत असतात. अशा सर्वसामान्य ग्राहकांना १२००० रुपयाचे मीटर खरेदी करणे त्यांच्या नावे सदरील रक्कम टाकणे संयुक्त नाही. स्मार्ट मीटर बिघडले तर दुरुस्त कोण करणार ? उद्याच्या काळात प्रश्न निर्माण त्यावेळी दुर्बल ग्राहकाचा बळी शेतकरी ग्राहकाचा त्यानंतर अन्याय सर्वसामान्य घरगुती ग्राहकाचा होईल. त्यामुळे स्मार्ट मीटरचा विरोध असल्यामुळे बसविण्यात येऊ नये अशी मागणी यापूर्वी निवेदनाद्वारे केली आहे. तरी पुन्हा या प्रसिद्धी पत्रका द्वारे मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे हे पुन्हा करीत आहेत तरी याबाबत दखल घ्यावी.



उमरगा - उमरगा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार श्री प्रवीण स्वामी यांचा त्यांच्या सुविद्य पत्नीसह कौटुंबिक सत्कार करताना दैनिक समर्थ राजयोगचे जिल्हा प्रतिनिधी श्रीकांत स्वामी, सौ रुपाली स्वामी, जानवी स्वामी, आणि आदित्य स्वामीसह परिवार.

# 'एमपीएल'मध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

**प्रतिनिधी** @ बीड

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. या यशाबद्दल खेळाडूंना बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# शिवराज्यभिषेक सोहळ्याला बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहावे - गंगाधर काळकुटे पाटील

## रायगडावर मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची मागणी

**प्रतिनिधी** @ बीड

रायगडावर होणारा शिवराज्यभिषेक सोहळ्यानिमित्त ६ जून रोजी 'लोकोत्सव' 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या ऐतिहासिक सोहळ्याचे बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी साक्षिदार व्हावे असे अवाहन शिवराज्यभिषक सोहळा समितीचे सदस्य गंगाधर काळकुटे पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये करून चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी यावेळी केली आहे.

बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे शनिवार दि. ३१ मे रोजी दुपारी १ वाजता पत्रकार परिषदेचे अयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.यावेळी ऋषिकेश बेदरे पाटील, गोपाळ धांडे, संजय गोडसे यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना गंगाधर काळकुटे पाटील म्हणाले की, रायगडावर विविध विकास कामे व्हावेत यासाठी चौंडीच्या धर्तीवर रायगडावरही मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात यावी अशी मागणी राज्यभरातून होत आहे. या मागणीची शासनाने दखल घ्यावी.शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला. मोठ्या थाटामाटात



राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला. जन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२५ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. तरी बीडसह महाराष्ट्रातील शिवप्रेमिंनी उपस्थित रहावे असे आवाहन गंगाधर काळकुटे पाटील यांनी केले.

असे असतील गडावर राजेंच्या उपस्थितीत कार्यक्रम...

शिवराज्याभिषेक सोहळा । जागर शौर्य भक्तीचा । गुरुवार, दि. ५ जून २०२५ दुपारी ०३.३० वा. राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधीस अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्यास प्रारंभ (जिजाऊ समाधी स्थळ, पाचाड)दुपारी ४.वा.-युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे भव्य स्वागत व शिवभक्तांच्या समवेत पायी गड चढण्यास प्रारंभ (स्थळ नाणे दरवाजा)दुपारी ०४.१५ वा. गडपूजन अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या उपस्थितीत, (स्थळः नगारखाना) दुपारी ०४.३० वा. युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती महाराज यांच्या हस्ते 'धार तलवारीची.. युद्धकला महाराष्ट्राची.... युद्धकलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ (स्थळः होळीचा माळ)सायं. ०७.०० वा. ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर (स्थळः होळीथा माळ) रात्री ०८.०० वा. जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा... (स्थळः राजसदर)रात्री ०१.०० वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (स्थळ: शिरकाई मंदिर)रात्री ०९.३० वा. वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन (स्थळः अगदीश्वर मंदिर)

शुक्रवार, दि. ६ जून २०२५,सकाळी ०७.०० वा. युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे शुभहस्ते पारंपारिक वाद्यांच्या गजरात ध्वजपूजन व ध्वजारोहण (स्थळः नगारखाना)

सकाळी ०७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (स्थळः राजसदर),सकाळी ०९.३० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राजसदरेवर आगमन

सकाळी ०९.५० वा. - युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे राजसदरेवर आगमन,सकाळी १०.०० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या शुभहस्ते श्री शिवछत्रपती महाराजांच्या उत्सवमूर्तीस अभिषेक सकाळी १०.२० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक,सकाळी १०.३० वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांचे शिवभक्तांना संबोधनसकाळी ११.०० वा. 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा शिवराज्याभिषेक' पालखी सोहळ्यास प्रारंभ,दुपारी १२.०० वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे जगदीश्वर मंदिर येथे आगमन,दुपारी १२:१५ वा. युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायास पंढरीच्या वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान (स्थळः जगदीश्वर मंदिर),दुपारी १२.२५ वा. श्री शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन.



# शेती, माती व पाण्यांचे संवर्धन अहील्याबाई होळकर यांनी केले - मनिषा तोकले

**प्रतिनिधी** @ बीड

शेती करणाऱ्या महीलांनी अहिल्याबाई होळकर यांचा आदर्श घ्यावा. अहील्याबाई होळकर यांनी त्यांच्या राज्यकारभारातील बहुतेक वेळ व पैसा लोकांची शेती माती व पाणी संरक्षित करून त्यांचे सवंर्धन करण्यासाठी खर्च केला आहे. रस्त्यावर प्रवास करणारांची तहान भागवण्यासाठी अनेक ठिकाणी विहीरी खोदल्या. देशातील नद्यांवर संरक्षक कवच बांधले. नदीला पुर आल्यानंतर लोकांना आपली वाहतूक करता येत नव्हती म्हणून नदीवर पुल बांधले. ज्या ठिकाणी नदीवर पुल बांधणे शक्य नाही त्या ठिकाणी नदीचा पुर ओसरेपर्यंत प्रवाशांना निवास करता यावेत असे निवारे बांधले. असे विचार महीला ऊसतोड कामगार संघटनेच्या अध्यक्ष मनिषा तोकले यांनी अहील्यादेवी होळकर जयंती निमित्त मार्गदर्शन करताना व्यक्त केले. महीला ऊसतोड कामगार संघटना महाराष्ट्र आणि महीला किसान अधिकार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी बीड येथे करण्यात आली. या जयंती निमित्त स्वतः शेती करणाऱ्या महीलांनी एकत्रित येवुन येणाऱ्या पावसाळ्यात शेतीच्या पिक पेरणीचे नियोजन केले.बीड तालुक्यातील ४० महीला कमी खर्चाची शेती करत आहेत.त्या महीलांनी एकत्र येवून राजमाता अहिल्यादेवी देवी होळकर यांची जयंती साजरी केली.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे आणि प्रा. श्रीनंद पाटील यांचा सेवा गौरव समारंभ उत्साहात संपन्न

प्रतिनिधी @ लातुर

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे आणि प्रा. श्रीनंद पाटील यांचा सहपरिवार सन्मानपत्र आणि आहेर देऊन अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते. तर विचारमंचावर संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक अॅड. काशिनाथ साखरे, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे, सत्कारमूर्ती उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे आणि प्रा. श्रीनंद पाटील आणि त्यांच्या सहचारिणी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील संगीत विभागाच्यावतीने प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि चमूने स्वागत गीत सादर केले.यावेळी प्रा. श्रीकांत माळी, प्रा. माधव नायने, डॉ. मंतोष स्वामी, प्रा. संगमेश्वर पानगावे, उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील आणि प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मनोगत व्यक्त केली. यावेळी सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी कायक वे कैलास हा आपणास मूलमंत्र दिला त्याचे अनुसरून



आपण आपल्या कृतीतून शैक्षणिक संस्थांमध्ये केले पाहिजे. शैक्षणिक संस्थांचा विकास हा त्या ठिकाणी असलेले शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कार्य संस्कृतीवर अवलंबून असतो असे ते म्हणाले. यावेळी सहसचिव सुनील मिटकरी म्हणाले की, आज महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील तीन प्राध्यापकांचा सेवा गौरव सोहळा संपन्न होत आहे या सर्व शिक्षकांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये विद्यार्थ्यांना घडविण्याचे मोलाचे कार्य केले आहे असे सांगून त्यांना पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्काराला उत्तर देताना उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे आणि प्रा. श्रीनंद पाटील यांनी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेतील सर्व संस्था पदाधिकाऱ्यांचे आभार मानून महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मौलिक सहकार्य केले त्याबद्दल समाधान व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे आणि प्रा. श्रीनंद पाटील यांचा त्यांचे नातेवाईक आणि माजी विद्यार्थ्यांनी सत्कार केला.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सेवानिवृत्त माजी प्राध्यापक, महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके, प्रा. कल्पना गिराम आणि आभार प्रा. शैलेश कानडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये उत्साहात साजरी

प्रतिनिधी @ बीड

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि विविध मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती आणि केंद्रातील लाभार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमास 'वामा' चित्रपटाचे नायक डॉ. महेशकुमार वनवे, प्राचार्य डी. जी. तांदळे सर, सेवानिवृत्त इंजिनीयर कांचनजी गायकवाड सर, डॉ. संजय तांदळे, प्रीतीताई बागलाने काकडहिरा गावाच्या सरपंच, कौशल्याताई चव्हाण, नितीन जायभाय सर (बीड शहर बचाव अभियान), बाजीराव ढाकणे (बेटी बचाव अभियान), निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, छाया सरोदे यांची विशेष उपस्थिती होती.डॉ. महेशकुमार वनवे यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन करत त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. त्यांनी अहिल्याबाईंनी घेतलेले जनहितकारी निर्णय, त्यांच्या दूरदृष्टीचा आणि पराक्रमाचा गौरव केला.प्राचार्य डी. जी. तांदळे यांनी देखील अहिल्या बाईंच्या राज्यकारभारातील सखोल पैलूंवर प्रकाश टाकत त्यांच्या कार्यातून आजच्या समाजाला प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.माजी मुख्याध्यापक मस्के सर यांनी स्वतः रचलेली अहिल्याबाईंवरील कविता सादर करून उपस्थितांना भावविवश केले.इंजिनीयर कांचनजी गायकवाड यांनी त्यांच्या राज्यकारभाराच्या कार्यशैलीवर भाष्य करत, त्या खऱ्या अर्थाने जनतेच्या राणी कशा होत्या हे सोप्या भाषेत सांगितले.कार्यक्रमाच्या प्रारंभी व्यवस्थापक राजू वंजारे यांनी निवारा केंद्राची ओळख करून देत त्याच्या कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी संचालक अभिजीत वैद्य यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमात जिव्हाळा निवारा केंद्रातील बेघर, अनाथ लाभार्थींचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनाने आणि प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

लोक कल्याणकारी राज्य त्या काळात महिला असताना अहिल्याबाईंनी अंमलात आणले - सरपंच प्रितीताई बागलाने

राजेशाही राजवट असलेल्या कार्यकाळात अहिल्याबाई होळकर यांनी लोकशाही असणारे सरकार राजगादीवर असताना देखील राबवले. आज देशांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जी आदर्श राज्यघटना दिली त्या आधारावर देश चालत आहे.याच धर्तीवर त्या काळात अहिल्याबाई होळकर यांनी जनतेच्या हिताचे सरकार राबवले होते हे विशेष. त्यांनी महिला, शेतकरी, जलसिंचन, लोकांच्या आर्थिक क्रांतीसाठी आणि स्वाभिमानासाठी उभारलेला लढा आदर्शवत होता, असे मनोगत काकडहिरा येथील महिला सरपंच प्रीतीताई बागलाने यांनी व्यक्त केले.

# धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करू नका, जिवंतपणी मृत्यूला आमंत्रण देऊ नका :- नितिन आडे

धर्माबाद ( अशोक पडोळे ):- ३१ मे हा जागतिक तंबाखू विरोधी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात आज तंबाखू विरोधी दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुजाता मुनेश्वर मॅडम होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी सह रुग्ण व नातेवाईकांना तंबाखू मुक्त दिनाची शपथ देऊन तंबाखू गुटखा चे दुष्परिणाम विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. तंबाखू या व्यसनाचा घातक परिणाम मानव शरीराच्या डोक्याचा केसांपासून ते पायापर्यंत सर्वच अवयवावर होतो.तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे तोंडाचा,फुफ्फुसाचा कर्करोग, हृदयरोग,यकृताचा आजार,मोतीबिंदू,फुफ्फुसाचे विकार असे विविध आजार जडत असल्याची माहीती या दिनाच्या अनुशगांने जनमानसात तंबाखु बाबतची जाणीव होण्याच्या दृष्टिने दि. ३१ मे रोजी जनजागृती करण्यात येत असल्याची माहीती दंतरोग तज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप मॅकलवार यांनी याप्रसंगी दिली.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन ही शालेय मुलांमध्ये आज सर्वांत मोठी चिंतेची बाब आहे.त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शालेय शिक्षक व पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.पालकांनी आपल्या मुलांसमोर स्वतः व्यसन न करता व्यसनापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, कारण ज्येष्ठांचे अनुकरण लहान मुले करत असल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे सम उपदेशक नितीन आडे यांनी याप्रसंगी दिली. तंबाखु व तंबाखु जन्य पदार्थ जसे जर्दा,बिडी,सिगारेट व इत्यादी सेवन करण्याचे प्रमाण लोकांमध्ये वाढत चालेले आहे.त्यामुळे दिवसेंदिवस लोकांमध्ये उच्च रक्तदाब,मधुमेह,कर्करोग,ह्रुदयरोग,







पक्षघात,अर्धांगवायू यासारखे आजार बळावु लागलेले आहे.डोक्यांच्या केसापासून पायाच्या नखापर्यंत तंबाखूचे दुष्परिणाम दिसून येतात.त्यामुळे या व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प तालुक्यातील सर्व संस्था,शाळा,शासकीय कार्यालय,ग्रामपंचायत यांनी तंबाखूमुक्त गाव,नगर व परिसर यांनी तंबाखु मुक्तीची संकल्प करुन चळवळ निर्माण करण्याची गरजेचे झाले आहे.प्रत्येक व्यक्तीने प्रथम स्व:तापासुन तंबाखुसारखे व्यसन सोडणे आवश्यक आहे.आसे अध्यक्षीय भाषणात डॉ. सुजाता मुनेश्वर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी

डॉ.प्रविण कांबळे , कार्यालयीन प्रमुख यादवराज नोमुलवार,इन्चार्ज सिस्टर शुभांगी सुर्यवंशी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी गुलाबराव गायकवाड, क्षयकिरण विभाग प्रमुख राम बोईनवाड , महालॅब प्रमुख रहीम खान,बालाजी चव्हाण ,गणेश झगडे, शिवराज लुखाने, जगदंबे परशुराम, विकास आगळे,निलेश जाधव, जेष्ठ परिचारिका मनिषा महामुनी,छाया कुलकर्णी सिस्टर, रुपाली सोनटक्के , पठाण मामा, संदीप लोट, सुशांत सावंत, अनिल हणमंते,प्रकाश कांबळे, रमेश जक्कावाड,जयश्री किनेवाड,प्रिया लोणे, मिना पेदे,जेनिफर वाघमारे, प्रतिक्षा कांबळे सुरक्षा रक्षक गणेश टोंपे, ज्ञानेश्वर गवळी सुरेश सह अधिकारी व कर्मचारी ,रुग्ण त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

तंबाखू तथा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब, ह्रुदयरोग,मधुमेह, मुख कर्करोग यासारखे अनेक दुर्धर आजार होतात.जागतिक आरोग्य संघटनेच्या २००४ च्या अहवालानुसार भारतात प्रतिवर्षी आठ ते नऊ लाख लोकांचा मृत्यू हा तंबाखू तथा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या आजारामुळे होतो हे प्रमाण कमी करणे आवश्यक असल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ वेणुगोपाल पंडित यांनी याप्रसंगी माहिती दिली दिली.

# साबला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । केज

तालुक्यातील मौजे साबला येथे ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली .सरपंच जनाबाई नरहरी काकडे , ग्रामपंचायत अधिकारी शिंपले तानाजी आश्रुबा यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात



आले . यावेळी उपस्थित एआरटी संस्था , यवतमाळ . प्रकल्प सहाय्यक श्रीमती ज्योती सांबरे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पवन सरवदे , पोपट काकडे तसेच रामराजे शिंदे , महादेव काकडे , गोरख काकडे , दत्तात्रय काकडे , अंगद काकडे , गुलाब मुळे , माऊली नाईकनवरे , समाजसेवक नरहरी काकडे जालींदर मुळे , लक्ष्मण काकडे इत्यादी नागरिक उपस्थित होते .



राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन करतांना जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते भगवान साकसमुद्रे,संतोष कुंडकर, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने, पत्रकार विकास वाघमारे, व मंजूळनाथ कुकर दिसत आहेत.



प्रतिनिधी @ बीड

राष्ट्रमाता लोकमाता राजमाता मासाहेब अहिल्यामाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डी जी तांदळे, मातृभुमी प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, अभिनेता डॉ महेशकुमार वनवे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, रामधन जमाले, बेघर जिव्हाळा निवारा केंद्राचे संचालक अभिजित वैद्य, छाया सरवदे, राजु वंजारे आदी उपस्थित होते

# परळी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

प्रतिनिधी । परळी

राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आल्याची माहिती ओबीसी परिषदेचे तालुका अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताटे यांनी दिली.

परळी येथील १२ ज्योर्तिलिंगापैकी प्रसिध्द असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या मंदिर परिसरातील अहिल्याबाई होळकर यांना नम्रपूर्वक अभिवादन करण्यात आले. अहिल्याबाईंनी प्रभू वैद्यनाथांचे मंदिराचा जीर्णोध्दार केला आहे.





पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी सर्व समाजासाठी आपला लढा दिला. शासनाने महाराष्ट्रातील अहमदनगर या शहराचे नाव अहिल्यानगर केले. त्याबद्दल भिमराव सातपुते यांनी अभिनंदन केले. पण शासनाने जाहिर केलेल्या धनगर समाजासाठीच्या योजना तळागाळापर्यंत पोहचत नसल्याने समाजाला त्याचा पूर्णतः फायदा होत नसल्याचे खंत व्यक्त केली. शासनाने तळागाळापर्यंत सर्व योजना पोहचवून त्यातील अडचणी दूर कराव्यात अशी मागणी सातपुते यांनी केली.

आज सकाळी वैद्यनाथ मंदिर परिसरातील राजमाता अहिल्याबाई होळकर यांना भिमराव सातपुते, विलासराव ताटे, अमोल सातपुते, डॉ.अरूण गुट्टे, मिलिंद घाडगे, प्रसन्नजीत रोडे, रमाकांतअप्पा निर्मळे, विश्वनाथ गायकवाड, कपिल गाडेकर, राजेश गडदे, सुनिल फुलारी, हरिभाउ मोदाणी, सुहास गोखले, भिक्षू कांबळे, गंगाधर वाघमारे आदींनी नम्रपूर्वक अभिवादन केले.

# लोकाभिमुख नेतृत्व - मा.रमेशरावजी आडसकर साहेब

**केज / चंद्रकांत पाटील**

चमकता सुरज किरणे दे आपको.
खिलते फुल खुशबू दे आपको
शितल चाँद उज्वलता दे आपको.
हर साल मे आनेवाले आपका जन्मदिन मुबारक हो आपको.✻

'हाबाडा फेम'.'लोकनेते' माजी आमदार सन्माननीय कै.बाबुरावजी आडसकर साहेब उर्फ तात्या यांचे धाकटे चिरंजीव अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांचा आज एक जून रोजी वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

वडीलांचा राजकरणाचा वसा गेली तीस वर्षा पासून सक्षमपणे ते चालवत आहेत.सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालतात. जनतेच्या सूख दुःखात सहभागी होतात.गोर गरीब,दीन,दलीत. बांधवांना मदत करतात.

जीवन के सुखद राह में बगीयाँ फुलों की खिलती रहे ।
जीदंगी के हर मोड पर सफलता आपको मिलती रहे ।

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आडसची स्थापन कै.माजी आमदार सन्माननीय तात्या यांनी केली.गोरगरीब घरच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी खेड्या पाड्यात शाळा काढल्या तसेच केज व आडस येथे ज्युनिअर कॉलेज व महाविद्यालय काढले.त्यांनीकाढलेल्या शाळेत शिकलेले मुले व मुली क्लास वन,क्लास टु,क्लास थ्री आधिकारी बनले आहेत.शेकडो विद्यार्थी डॉक्टर, इंजीनियर पदावर कार्यरत आहेत. मोठ्या साहेबांनी शिक्षण रूपी लावलेल्या रोपट्याला झारीने पाणी घालण्याचे काम सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी केले.आज छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आडसचे रूपांतर आज वटवृक्षात झाले आहे. सामाजीक,राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे कार्य नेत्रदीपक आहे.शारदा इंग्लिश स्कूल केज, वसंत विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच कै.माजी आमदार लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब वरीष्ठ महाविद्यालय केज,केज तालुक्यात टॉपवर आहेत.धारूर,केज, वडवणी,अंबाजोगाई, कळंब तालुक्यात साहेब यांच्या सर्व शैक्षणिक शाखा गुणवत्ता धारक विद्यार्थी घडवत आहेत. सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी बदलत्या काळानुसार वेगळे वेगळे शैक्षणिक युनिट केज,धारूर,



कळंब शहरात आणले आहेत.उदा. पॉलिटेक्नीक,डीफार्मसी,नर्सींग कॉलेज,इंग्लिश स्कूल शाळा इत्यादी. सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांनी राजकारणात खूप कार्यकर्त्यांना मोठे केले आहे.सामान्य शेतकरी परीवारातील आसरडोह गावचे निष्ठावंतकार्यकर्ते छोट्या खेडेगावातील रहीवासी भारतराव पिंगळे यांच्या पत्नीला बिड जि.प.अध्यक्ष पद दिले होते.ग्रामपंचायत सरपंच,चेअरमन,पं.स. सभापती.मार्केट कमेटी सभापती,जि.प.सदस्य, डी.सी.सी.बँक संचालक,नगरसेवक, नगराध्यक्ष अशी शेकडो पदे सामान्य कार्यकर्त्यांना दिली आहेत.

साहेब तुम्ही देत राहीलात इतके की,
काही घेऊन घेऊन थकले.
उपकार तुम्हचे विसरून प्रेमास तुम्हच्या मुकले.

सन. २००२ मध्दे आसरडोह जी.प.सर्कलमधुन निवडणूक लढवली व प्रचंड मतांनी विजय संपादन केला व जिल्हा परीषद बीड उपाध्यक्ष पद भुषवले.वेगवेगळ्या तीन तालुक्यातुन जी.प.सर्कल मधुन साहेब यांनी विजय संपादन केलेला आहे.दीर्घकाळ त्यांनी जिल्हा परीषद बीड सभागृहात काम केलेले आहे.बीड जिल्यातील प्रतेक खेडेगावात त्यांनी केलेली कामे पोहचलेली आहेत.उदा.सिमेंट रस्ते,लाईट,शाळा कंपाऊंड वॉल भिंती,शाळा खोल्या,नळ पाणीपुरवठा योजना,दोन गावांना जोडणारे डांबरीकरण रस्ते आसी असंख्य कामे त्यांनी केली आहेत.

उगवणार्या प्रत्येक दीवसाला तुम्ही नवीन अर्थ दिला.
तुम्हच्या दारी आलेला प्रत्येक जन समाधानाने घरी गेला.

अवसायानात निघालेला अंबा सहकारी साखर कारखाना गेली तेवीस वर्षांपासून उत्कृष्ट पध्दतीने चालवत आहेत.सन.२००२ मध्दे बंद पडलेला कारखाना सुरू करण्यासाठी अनंत अडचणी आल्या.१९७५ साली स्थापन केलेल्या कारखान्याची सर्व मसनरी निकामी झालेली होती.पण सभासद बांधवांनी सन्माननीय रमेशरावजी आडसकर साहेब यांच्यावर विश्वास टाकून सन. २००२ मध्ये अंबा सहकारी साखर कारखाना प्रचंड बहुमताने आडसकर साहेब यांच्या ताब्यात दिला.तत्कालीन सहकार मंत्री पतंगरावजी कदम साहेब यांनी मदत केली.लीक्वीडेशन मध्ये निघालेल्या अंबा सहकारी साखर कारखान्याला गत वैभव प्राप्त करून देण्याचे काम सन्माननीय आडसकर साहेब यांनी केले आहे.

निवडणुकीत आतोनात बिगरकामी होणारा खर्च टाळण्यासाठी विरोधकांना सोबत घेऊन अंबासहकारी साखर कारखाना बिनविरोध काढला. अंबासहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पद दत्ता पाटील साहेब यांना दिले.तीन जील्यात विस्तारीत कार्यक्षेत्र असणार मराठवाड्यातील एकमेव सहकारी साखर कारखाना आहे.लातुर,बिड, धाराशिव,तीन जील्यातील सभासद बांधव आज पण साहेब यांचे उपकार मानत आहेत.कारण जेव्हा जेव्हा ऊस उत्पन्न वाढले तेव्हा तेव्हा शेतात वाळत चाललेला ऊस वाहाने पाठवुन आणण्याचे. पुण्याचे काम आडसकर साहेब यांनी केले आहे.हजारो ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना आधार दिला .सध्या देखील कारखाना सुरू करण्यासाठी अनंत अडचणी आहेत.

जो पाहाडो सें टकरता है.
उसे तुफान कहते हैं.
जो तुफान से टकरता है.
उनको रमेश रावजी आडसकर साहब कहते हैं.

गेली तीस वर्षापासून राजकारणातील अनेक चढ उतार त्यांनी बघीतले विधानपरीषद अथवा विधानसभा सभाग्रात काम करण्याची त्यांना पक्षश्रेष्ठींनी संधी देणे आवश्यक होते.पण प्रतेक निवडणुकीत तिकीट वाटपात घोडेबाजार होतो.भविष्यकाळात तरी त्यांना राजकारणात मोठी संधी मिळाली पाहिजे.एखादे काम घेऊन आलेल्या माणसाला तु कोण्या पक्षाचा, कोण्या पार्टीचा , कोण्या गटाचा हे त्यांनी कधीच विचारले नाही.फक्त आणि फक्त काम काय ते विचारले.काम होण्यासारखे आसेल तर पटकन काम करून टाकतात.काम होण्या सारखे नसेल तर काम होत नाही हे स्पष्ट पणे सांगतात.लोकांना झुलवत ठेवणे त्यांना अजीबात पटत नाही.सन्माननिय.आडसकर साहेब यांच्या एका फोनवर प्रशासकीय अधिकारी कामे करून देतात.साहेब यांचा एक एक शब्द लाख मोलाचा आहे.

खुशी रहे जीवन में सदा,गम ना कोई भी आऐ।
इसी दुवा के साथ.जन्मदिन की शूभकामनाएं।।

आज पण केजला त्यांच्या घरी आलेल्या सामान्य माणसाला चहा पाणी घेतल्या शिवाय परत जाऊ देत नाहीत.सन्माननिय.कै.माजी आमदार आदरणीय तात्या देखील आडसला त्यांना भेटायला आलेल्या प्रत्येक माणसाला चहा पाणसुपारी घेतल्याशिवाय जाऊ देत नव्हते.सध्या देखील साहेब यांचे पुतणे.युवा.नेते.सन्माननिय.ऋषीकेशजी भैय्यासाहेब आडसला त्यांना भेटायला आलेल्या माणसाला चहापाणी घेतल्याशिवाय परत जाऊ देत नाहीत.सत्ता असो अथवा नसो.आडसकर परीवार कायम जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी चोवीस तास कायम तत्पर असतात.

गेली पन्नास वर्षांपासून केज मतदार संघ राखीव असल्याने सन्माननीय.रमेशरावजी आडसकर साहेब यांना राजकारण करत असताना खुप अडचणी येतात. नुकत्याच झालेल्या सन.२०२४माजलगाव विधानसभा मतदारसंघात निवडणुकीत तिकीट वाटपात घोडेबाजार झाला.पैसे घेऊन तिकीटे वाटली गेली.माजलगाव व केज विधानसभा दोन्ही जागा शुअर असताना.मोठे पवार साहेब राष्ट्रवादी पक्षाला दोन्ही जागा गमवाव्या लागल्या.जर दोन तिकिटे सन्माननीय.रमेशरावजी आडसकर साहेब यांच्या मागणीनुसार दीली असती.तर आज दोन आमदार मोठे पवार साहेब यांच्या पक्षाचे दीसले असते.साहेब अपक्ष लढले होते तरी देखील चाळीस हजार मते मिळवली आहेत. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात सर्व सोसीयल मिडीयाच्या सर्वे मध्ये साहेब आघाडीवर होते पण .... साहेब यांना पराभव स्वीकारावा लागला.केज मार्केट कमिटी, धारूर मार्केट कमिटी, केज पंचायत समिती, धारूर पंचायत समिती,केज नगरपंचायत बिड.जी.प.,डी.सी.सी.बँक, अंबा सहकारी साखर कारखाना, शिक्षण संस्था,विविध संस्थांच्या माध्यमातून राजकारणात साहेबांनी नावलौकिक मिळविला आहे.छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित, आडस, सहकारी संस्था, शिखर बँक,इतर अनेक क्षेत्रात गोरगरीब घरच्या शिक्षीत तरूणांना नौकरीला लावले आहे.वेगवेगळ्या क्षेत्रात आदरणीय.कै. तात्या यांच्या काळात व सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब यांनी आजपर्यंत पंधरा ते वीस हजार गोरगरीब घरची मुले नौकरी ला लावले आहेत.केज तालुक्याच्या राजकारणातील उगवते तारे.युवा नेते.सन्माननिय ऋषिकेश भैय्यासाहेब व युवा नेते.सन्माननिय.रणजीत दादा साहेब सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय काम करत आहेत.सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब यांनी पुर्ण वेळ जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वा:ताहाला वाहुन घेतले आहे.

फुल कितना भी सुंदर हो,तारीफ उसके खुशबू से होती है!
इंसान कितना भी बडा हो इज्जत उनके गुणो से होती है।।

सहकारी साखर कारखान्याचे धडाडी चे चेअरमन सन्माननिय.रमेशरवजी आडसकर साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आडसकर चषक -२०२५ केज पंचायत समिती मैदानावर भव्य नाईट क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून संघ आले होते.२००९२१/-रूपये प्रथम पारितोषिक सोलापूर संघाने जीकंले.द्वीतीय पारितोषिक १००९२१/- रूपये धाराशिव संघाने जीकंले.तृतीय पारितोषिक ५०९२१/-रूपये परळी संघाने पटकावले.चतुर्थ पारितोषिक ३०९२१/-रूपये कडा संघाने पटकावले.स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक संघाना देखील २०९२१/-रूपये पारितोषिक देण्यात आले.नाईट सामने खेळविण्यात आले.मैदानाची लाईट सिस्टीम क्षेम इंडियन आय.पि.एल.सारखी करण्यात आलेली होती.मराठवाडा आडसकर आय.पि.एल.चॅम्पियन चषक -२०२५ ऐतिहासीक झाला.आठ दीवस केज शहरातील क्रिकेट रसिकांना मोठी मेजवानी मिळाली.राजकारणातील उगवते तारे.युवा नेते.सन्माननिय.ऋषीकेश भैय्यासाहेब व युवा नेते.सन्माननिय.रणजित दादा साहेब यांनी क्रिकेट स्पर्धा उत्कृष्ट पार पाडण्यासाठी खुप परीश्रम घेतले आहेत.

फुलों के जैसे खिलखिलाते रहो।भंवरो के जैसे गुनगुनाते रहो।
आपके लिए मन्नतें मांगते हैं यही।

✻उम्र भर आप मुस्कुराते रहो।सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत.चोवीस तास जनतेसाठी उपलब्ध राहाणारे नेते.गाडीला हात दाखवला आसता गाडी थांबवून अडचण विचारणारे नेते.गाडीची काच खाली घेऊन फिरणारे नेत.चारीत्र्यसंपन्न,स्पष्टवक्तेपणा, शिस्तबध्दपणा, आसे सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व आहेत.माजलगाव व केज मतदार संघात सन्माननिय.रमेशरावजी आडसकर साहेब यांना मानणारा खुप मोठा जनसमुदाय आहे.परळी मतदार संघात देखील त्यांचे बांधील पंचवीस ते तीस हजार मतदार आहेत.कारण रेणापूर व अंबाजोगाई तालुक्यातील साहेब यांना मानणारी अनेक गावे परळी मतदार संघात गेलेली आहेत.संपुर्ण बिड जील्यात त्यांना मानणारा खुप मोठा वर्ग आहे.गेली तीस वर्षापासून आडसकर साहेब संपूर्ण वेळ गोरगरीब, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळ देत आले आहेत.उपमुख्यमंत्री सन्माननिय.अजीत दादा यांनी सामान्य जनतेच्या भावना समजून घेऊन लवकरात लवकर सन्माननीय.आडसकर साहेब यांना विधान परिषदेची आमदार की देणे अथवा पक्षाची प्रादेशिक पातळीवर काम करण्याची संधी देणे.ही जनतेची अनेक वर्षांपासून मागणी आहे.

येणारा प्रत्येक दिवस साहेबांच्या आयुष्यात भरभरून यश आणि आनंद घेऊन येवो, आयुष्यात तुम्हाला वैभव, आरोग्य,पद, प्रसिद्धी लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना!



## जेथे कर्तृत्वाची प्रचिती तेथे कर माझे जुळती असे कर्तृत्ववान जन सामान्यांचे लढवय्ये नेते रमेशराव आडसकर

जून महिना वर्षा ऋतू च्या आगमनाची चाहूल लागते. हाच तो महिना केज तालुक्याला राजकीय ओळख मिळवून देणारे माजी आमदार कै.बाबुरावजी आडसकर यांचे सुपुत्र, अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर यांचा जन्मदिवस.

वाढदिवस म्हणजे उत्सव, गर्दी, जाहिरात बाजी पण रमेशराव आडसकर यांची नेहमीच साधेपणाला प्राधान्य देण्याची भूमिका राहिली आहे.राजकारणात पद नसतानाही समाजा साठी झटणाऱ्या व्यक्तीमत्वाची ओळख म्हणजे रमेशराव आडसकर.कोरोनाच्या महामारीत केवळ सत्ताधाऱ्यांवर न विसंबता त्यांनी धारुर येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात १०० खाटांचे कोविड केअर सेंटर उभे करून ऑक्सिजन,औषधे,अन्न आणि निवासाच्या सुविधा पुरवून हजारो रुग्णांचे प्राण वाचविले. हे संकट सर्वांचे आहे, ही त्यांची भावना होती. बाबुराव आडसकर यांचे संस्कार त्यातूनस्पष्टपणे जाणवतात.

राजकारणात रमेशराव आडसकर यांचा प्रवास जि.प.सदस्य म्हणून आसरडोह व चनई सर्कलमधून सुरू झाला. योगेश्वरी सुतगिरणी पासून अंबा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदापर्यंतचा प्रवास म्हणजेच शेतकऱ्यांच्या हिता साठीचा संघर्ष.पक्षभेद न ठेवता विकासाला प्राधान्य देणे,सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य.

शिक्षणक्षेत्रात त्यांनी श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेमार्फत ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये,आयटी आय,डी.फार्मसी यांसारख्या शिक्षण संस्था उभारून शैक्षणिक क्रांती घडवली.त्यांच्या पत्नी अर्चनाताई आडसकर यांचे यामध्ये मोलाचे योगदान आहे.केवळ शिक्षणच नव्हे,तर कोविडच्या काळात शैक्षणिक इमारती रुग्णालयात रूपांतर करून समाजासाठी वापरल्याचे उदाहरण केवळ रमेशराव आडसकर यांच्या कडून च शक्य होते.

पाणी फाउंडेशनच्या उपक्रमात प्रत्यक्ष श्रमदान,गोरगरीबांसाठी अन्नधान्य वाटप, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे,हे सारे काम गोंगाटाशिवाय,प्रसिद्धी पासून कोसो दूर राहून केले गेले.माजलगावचे बाहेरचे उमेदवारम्हणून उल्लेख होणाऱ्या रमेश आडसकरांनी मतदार संघात सर्वप्रथम पोंहोचून मदतीचा हात दिला हीच त्यांची खरी ओळख.

राजकारणातील त्यांच्या कार्याची दखल घेत आज ते राष्ट्रवादीकाँग्रेस मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत.शेतकरी,युवक, व्यापारी,कामगार सर्वांनाच जवळचे वाटणारे आडसकर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होतात. सामान्य माणूस थेट त्यांच्या बंगल्यावर जाऊन भेटू शकतो हीच खरी लोकनेतेपणाची ओळख.

त्यांचे सुपुत्र रणजित दादा आणि पुतणे ऋषिकेश भैया आडसकर हे ही सामाजिक व राजकीय कार्यात सक्रिय आहेत. रमेशराव आडसकर यांच्या जीवनकार्याचा घेतलेला मागोवा हे सिद्ध करतो की,नेतृत्व ही फक्त पदांनी नव्हे तर कृतीतून सिद्ध करावे लागते.

आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा...!

मै अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल,मगर
लोग आते गये और कारवां बनता गया...







हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).



# लोकनेत्याच्या स्मृतीदिनाची गोपीनाथगडावर जय्यत तयारी

**२ जूनला 'नो प्लास्टिक' उपक्रम, वैद्यनाथ मंदिरात स्वच्छता तर ३ जूनला रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप यासह विविध उपक्रमांचे आयोजन**
**रामायणाचार्य ढोक महाराजांचे मंगळवारी गोपीनाथगडावर सुश्राव्य कीर्तन**

**प्रतिनिधी @ परळी**

गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. याअनुषंगाने गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी सुरु आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत, त्यानिमित्त गोपीनाथगड येथे तयारी सुरु आहे.

राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित असणार आहेत. यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन

सामाजिक उपक्रमा बरोबरच ३ जूनला दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाची शक्यता लक्षात घेऊन १२०ह्न२०० आकाराचा वॉटरप्रूफ मंडप आणि सामाजिक उपक्रमांसाठी स्टॉल्स आणि कक्ष उभारणीचे काम सध्या गतीने सुरु आहे. तर गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

सोमवारी वैद्यनाथ मंदिरात कापडी बॅग मशीनचे उदघाटन व स्वच्छता

सोमवार २ जून रोजी सकाळी ११ वा. पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शहरातील आनंदधाम येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण तर पर्यावरण विभाग व गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिरात 'नो प्लास्टिक' उपक्रमाअंतर्गत कापडी पिशवी मशीनचे उदघाटन, मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

# अहिल्याबाई होळकर या आदर्श राज्यकर्त्या डॉ. बबन पवार



परभणी : येथील शारदा महाविद्यालयामध्ये अहिल्याबाई होळकर यांची जयंती इतिहास विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार हे होते तर उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे व गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. नाकाडे संतोष हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांचे कार्य हे संपूर्ण भारतभर असल्यामुळे त्यांचा आज सर्वत्र नावलौकिक असल्याचे सांगितले. त्या भारतभूमीवरील आदर्श राज्यकर्त्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ. नितीन बावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. पाठक श्याम यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# मराठीची गळचेपी करणाऱ्या धोरणांविरुद्ध ठाम भूमिका घेण्याची गरज : प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील

परभणी (प्रतिनिधी): जो समाज स्वतःच्या मातृभाषेविषयी अनास्था दाखवतो अशा समाजाला काळ माफ करणार नाही. स्वभाषेची गळचेपी करणाऱ्या धोरणांविरुद्ध समाजातल्या सर्व विचारी घटकांनी ठामपणे उभे राहून विरोध नोंदवला पाहिजे. मराठी भाषा टिकवण्याची जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे असे प्रतिपादन मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी केले.

साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते देविदासराव कुलकर्णी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्याना प्रसंगी ते बोलत होते.

बी रघुनाथ महाविद्यालयात २७ मे रोजी मराठवाडा साहित्य परिषद शाखा परभणी च्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास छत्रपती संभाजी नगर मसापचे कार्यवाह डॉ. दादा गोरे, उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, सदस्य सरोज देशपांडे आदींची उपस्थिती होती. यावेळी कौतिकराव ठाले पाटील यांनी ' साहित्य संस्था वारसा आणि वसा ' या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पुढे बोलतांना कौतिकराव ठाले पाटील म्हणाले की,

मराठी भाषेत कार्य करणाऱ्या अनेक संस्था व परिषद आहेत या सर्व संस्थांचा जन्म त्या त्या ठिकाणी झालेल्या साहित्य संमेलनातून झाला आहे.

प्रारंभी बी रघुनाथ व देविदासराव कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.भगवान काळे यांनी तर आभार मारुती डोईफोडे यांनी मानले.या कार्यक्रमास कवी इंद्रजीत भालेराव , केशव वसेकर, रेणू पाचपोर, कवी देविदास फुलारी , महेश मोरे, बाबा कोटंबे, मोहन कुलकर्णी, राजेंद्र गहाळ, सावित्री चिताडे, अरविंद सगर, बबन आव्हाड, गंगाधर गायकवाड, शिवाजी मरगीळ, डॉ. सखाराम कदम, डॉ. सुरेश हिवाळे, माधव गव्हाणे, संजय चिटणीस, डॉ. दत्ता शिंदे, अरुण चव्हाळ, प्रा. प्रवीण पुरी, प्रा. नवनाथ सिंगापुरे, प्रा. हनुमान व्हरगुळे, डॉ. पंडित निर्मळ, दिनकर देशपांडे यांच्यासह साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महेश नवमी सप्ताह २०२५ अंतर्गत परळी वैजनाथमध्ये युवा माहेश्वरींच्या उपक्रमांची मांदियाळी

**प्रतिनिधी @ परळी**

|| समाज के लिए, समाज के साथ ||

महेश नवमीच्या निमित्ताने युवा माहेश्वरी परळी वैजनाथच्या वतीने १ जून पासून ४ जून २०२५ पर्यंत विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण

महेश नवमी सप्ताहाची सुरुवात १ जून रोजी सकाळी ७.३० वाजता राजस्थानी मुक्तीधाम स्वच्छता मोहिमेने होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता मुक्तीधाम परिसराच्या सुशोभीकरणासाठी कलर भेट आणि वृक्षारोपण करण्यात येईल. या उपक्रमांतून सामाजिक जाणीव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत
## कृषि शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी १ जून २०२५ पासून सुरू

**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्रात नियमित कृषि शिक्षण घेऊ न शकणार्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत मुक्त कृषि शिक्षण केंद्र, सौ. के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड. येथे नववी किंवा दहावी उत्तीर्ण नवीन तसेच जुन्या विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाच्या कृषि शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन नोंदणी दिनांक ०१/०६/२०२५ पासून चालू होणार आहे.

तरी आपण ऑनलाइन नोंदणी करण्यासाठी प्रा. बी.बी. तांबोळकर किंवा प्रा. ए.पी. ढोरमारे, यांच्याशी संपर्क साधावा. मो. ९८२३८२८६४५, ९६०४२७६२३४, ९६०४८३३७१५ प्रवेश मिळवण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे.

# पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे ही आपली सर्वांची जबाबदारी

**प्रतिनिधी @ मुंबई**



**पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे सिद्धिविनायक मंदिर परिसरात सिंगल युज प्लास्टिक विरोधात जनजागृती कार्यक्रमातून मंत्री पंकजा मुंडे यांचे आवाहन**

देशाचे जबाबदार नागरिक म्हणून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रदूषण कमी करणे, तसेच वन्यजीव आणि वनस्पतींचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. हा कार्यक्रम धार्मिक स्थळाच्या परिसरात पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याबरोबरच पुढच्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित भविष्य घडवण्याच्या दृष्टिकोनातून महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

आज मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर परिसरात नागरिकांमध्ये सिंगल युज प्लास्टिक टाळण्याचे आवाहन तसेच सिंगल यूज प्लास्टिक बंदीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्रीमती. मुंडे बोलत होत्या. या कार्यक्रमास सिद्धिविनायक मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, सिंगल युज प्लास्टिकचा भस्मासुर रोखायलाच हवा, सिंगल युज प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे याकरिता सिंगल युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्यासाठी संकल्प, संयम आणि प्रत्यक्ष कृती याची नितांत गरज आहे. शासन स्तरावर सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना आळा घालण्यासाठी वेळोवेळी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. यासाठी विभागामार्फत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी प्रभावी धोरणे आणि नियम ही लागू करण्यात आले आहेत. सिंगल यूज प्लास्टिकवर निर्बंध घालण्याबरोबरच, जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, कॉलेज, आणि सार्वजनिक ठिकाणी जागरूकता मोहिम देखील राबवल्या जात आहेत. कार्यशाळा, चर्चासत्रे, आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाचा संदेश पोहोचवला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमा अंतर्गत मंत्री पंकजा मुंडे यांनी सिद्धिविनायक मंदिर परिसरातील स्टॉलधारकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवण्याचे सांगत स्वत: कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरणपूरक जीवनशैलीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या वेळी प्लास्टिकच्या पर्यायांविषयी माहिती देणारे सूचना फलकांबरोबरच पर्यावरण जनजागृतीच्या घोषवाक्यांनी मंदिर परिसराचे वातावरण दुमदुमून गेले. पर्यावरण रक्षणासाठी शासन, संस्था आणि नागरिकांनी एकत्र येवून काम केल्यास नक्कीच सकारात्मक बदल दिसून येतील असेही मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी सिद्धिविनायक ट्रस्टने सुद्धा प्लास्टिक बंदीसंबंधी जनजागृती कार्यक्रमात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



चौंडी - येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे साहेब यांच्या समवेत पूजा करण्याचा योग बीड येथील प्रसिद्ध पुजारी ओंकार स्वामी काळेगावकर यांना आला.




# गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांस अडचण आल्यास समाज म्हणून एकत्र येवू -रतन गुजर

**प्रतिनिधी @ बीड**

दि.३० मे २०२५ रोजी अखिल भारतीय गुजर देवसेना संस्था मार्फत गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाला गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित असलेले देवसेनेचे संस्थापक अध्यक्ष बालुरामजी गुजर,




बन्सीलाल गुजर, मुकेश चावडा, गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, गुजर समाज सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष अर्जुन बहिरवाळ, ॲड.युवराज भैय्या बहिरवाळ, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर, सुनिल बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, लक्ष्मण बहिरवाळ, लहू दहे, पिनु डोंगर, हलीम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पाली येथे लाईटच्या विद्युत तारा सतत तुटत असल्याने धोका वाढला नवीन तारा टाकण्याची मागणी

**प्रतिनिधी @ पाली**



बीड तालुक्यातील मौजे पाली येथे लाईटच्या विद्युत तारा सतत तुटत असल्याने धोका वाढला आहे तरी याकडे विद्युत कंपनीचे लक्ष नसल्यामुळे हा प्रकार वारंवार घडत आहे

सध्या पंधरा दिवसा सततच्या पावसाने ह्या तारा एकमेकाला घर्षण होऊन पार्किंग होते त्यामुळे तारा तुटतात, येणारा जाणाऱ्यांना तुटलेल्या तारा दिसत नाही व त्या ठिकाणी विद्युत प्रवाह चालू असतो, ही मेन लाईन बीडहून मांजरसुंबाकडे चौसाळाकडे गेलेली आहे . पावसाळ्यात विद्युत तारा खालील झाडे तसेच काही नागरिकाच्या घरावरून लाईन गेलेली आहे व त्या ठिकाणी लोमकळलेल्या तारा मुळे त्या ठिकाणी विद्युत प्रवाह उतरतो. त्यामुळे नागरिकाच्या जीवास धोका निर्माण झालेला आहे ह्या तारा जीर्ण झालेल्या असून त्या सतत तुटत आहेत. तरी विद्युत कंपनीने नवीन तारा बसून घ्याव्यात अशी मागणी पाली येथील ग्रामस्थांनी केली आहे तसेच बीडहून चौसाळाकडे जाणारे मेन लाईन ही गावाच्या बाहेरून न्यावी अशी मागणी देखील येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# कृत्रिम बुध्दीमतेमुळे पत्रकारितेच्या सीमा विस्तारल्या- प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

**प्रतिनिधी @ रत्नागिरी**

कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे पत्रकारितेच्या सीमा विस्तारल्या आहेत, असे मार्गदर्शन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान साचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

कोकण विभागीय पत्रकारांच्या कार्यशाळेत 'कृत्रिम बुद्धीमत्ता, समाजमाध्यम आणि जबाबदार पत्रकारिता विषयावर श्री.सिंह यांनी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, मोबाईलमुळे मोठा बदल घडून आलेला आहे. पत्रकारितेतील कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर फायदेशीर आहे. त्यामुळे कामांमध्ये सुलभता आली आहे. एकाचवेळी ९ भाषांमध्ये लाईव्ह भाषणाचे भाषांतर करता येते, असे सांगून, समाज माध्यमांमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेचा अतिरेक, कृत्रिम बुध्दीमत्तेमुळे होणारे फायदे आणि होणारे नुकसान याबद्दल मार्गदर्शन केले. सत्य तुमच्याकडे आहे मात्र एआय ला सत्य काय आहे हे माहीत नसते.श्री. सिंह म्हणाले की, मी स्वत: पत्रकार कुटुंबातून आलो आहे. माझे वडील अधिस्वीकृतीधारक पत्रकार होते. शासनाने मला त्याच विभागात काम करण्याची संधी दिली त्याबद्दल मी शासनाचा ऋणी आहे. यावेळी कार्यशाळेत उपस्थित पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची श्री. सिंह यांनी दिलखुलास उत्तरे दिली.



# भाऊसाहेब डावकर यांनी शाळेला दिले संगणक तर परमेश्वर सोळंके यांच्याकडून शेतकऱ्यांना बीयाणे वाटप

## विविध उपक्रमांनी अमरसिंह पंडित यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**प्रतिनिधी @ गेवराई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई विधानसभा मतदारसंघात विविध उपक्रम राबविण्यात येऊन कार्यकर्त्यांनी आपल्या लाडक्या नेत्याला शुभेच्छा दिल्या. शेतकऱ्यांना बी- बीयाण्यांचे वाटप, शाळेला संगणक भेट देण्यात आले

माजलगाव तालुक्यातील मौजे सादोळा येथील परमेश्वर सोळुंके हे गेल्या पाच वर्षांपासून अमरसिंह पंडित यांच्या वाढसानिमित अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी-बियाणे वाटप करत असून आज गढी येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी- बीयाण्यांचे वाटप करण्यात आले. सादोळा येथील परमेश्वर सोळुंके यांच्या वतीने श्रीपाद सोळंके, श्रीकिसन सोळुंके, सरपंच विष्णुपंत घोंगडे, उपसरपंच राजू पठाण, माजी सरपंच अंकुश गायकवाड, रामदास मुंडे, मंगेश कांबळे आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गढी येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांना बी-बियाणांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला श्रीचंद सिरसट, अमोल ससाणे, दिलीपराव नाकाडे, डॉ. चंद्रशेखर गवळी, अंकुश इंगळे, उद्धव नाकाडे आदींची उपस्थित होती. प्रातिनिधीक स्वरूपात पांडुरंग जाधव, लक्ष्मण मगर, ज्ञानेश्वर मोरे, अनिल मगर, शंकर इंगळे, गा मधुकर गायकवाड, महादेव नाकाडे, भारत जाधव, शहादेव शिरसाठ, गणेश गायकवाड, पद्माकर कुलकर्णी, गजानन गायकवाड आदींसह गढी येथील जवळपास १२५ शेतकऱ्यांना



बी-बियाणांचे वाटप करण्यात आले.तर भाऊसाहेब डावकर यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरसदेवी या शाळेला संगणक भेट दिला. यावेळी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी प्रमोद गोरकर बोरकर मुख्याध्यापक कोकाटे सर, श्री पवार सर सरपंच तेजाब चव्हाण, श्रीराम शेळके, कोळपे सर, प्रीतम पवळ, गव्हाणे सर, घोडके सर, उबाळे सर, ढाकणे सर, माने सर, रोमन सर, शेळके सर, गायकवाड सर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# तुलसी समूहाच्या डॉ.अब्दुल कलाम महाविद्यालयास नॅकचा बी दर्जा प्राप्त

**प्रतिनिधी @ बीड**

तुलसी शैक्षणिक समूह अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या नेकनूर येथील डॉ.अब्दुल कलाम संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयास नॅशनल असेसमेंट अँड अॅक्रिडेशन कौन्सिलने (नॅक) पुढील पाच वर्षांसाठी बी दर्जा प्रदान केला आहे.

नॅक च्या तीन सदस्यीय मूल्यांकन समितीने दिनांक २३ आणि २४ मे २०२५ रोजी महाविद्यालयास ऑनलाइन भेट देऊन शैक्षणिक पाठ्यक्रम, शिक्षकांची गुणवत्ता, संशोधन, विद्यार्थी केंद्रित उपक्रम, इमारत आणि तंत्रज्ञान या सात मुख्य निकषांवर महाविद्यालयाची सखोल तपासणी केली. सर्व निकषांचे योग्यरित्या परीक्षण करून नॅक ने या महाविद्यालयाला दिनांक २९ मे २०२५ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी २.०६ उत्र्क्ष- स्कोअरसह 'इ' ग्रेड प्रदान केला आहे.डॉ.अब्दुल कलाम कॉलेजने एक ऐतिहासिक कामगिरी करत बीड जिल्ह्यातील पहिले विनाअनुदानित आयटी महाविद्यालय म्हणून नॅक मूल्यांकनात यश मिळवले आहे. हे महाविद्यालय ग्रामीण भागात असूनही गुणवत्ता, शैक्षणिक बांधिलकी आणि आधुनिक सुविधांच्या जोरावर नॅकच्या कठोर निकषांमध्ये यशस्वी ठरले आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे.या यशामागे प्रा.डॉ.लक्ष्मीकांत गौड व प्रा.संतोष तोंडारे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांनी प्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक प्रा.डी.जी.निकाळजे व प्रा.फुलचंद धनवे,प्रा.समीर मिर्झा,प्रा,साबळे स्वाती, प्रा.प्राची पाठक, प्रा.संतोष चव्हाण, वंजारे यशोजीत,वंजारे प्रमोद,विद्यागर भैय्यासाहेब यांचेसह संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की,नॅकचा 'इ' दर्जा मिळवणे हा संस्थेच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हा दर्जा केवळ प्रमाणपत्र नसून, संस्थेतील सतत चालू असलेल्या गुणवत्ता सुधारणा प्रक्रियेचे प्रतिबिंब आहे. आमचे भविष्यातील ध्येय '-' ग्रेड मिळविण्याकडे आहे.महाविद्यालयास 'इ' दर्जा प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वडवणी वकील संघाच्या वतीने न्यायाधीश हिंग्लजकर साहेब यांचा निरोप समारंभ संपन्न

**प्रतिनिधी @ वडवणी**

वडवणी न्यायालयाचे न्यायाधीश मा.डि.एम हिंग्लजकर साहेब यांची बदली झाल्याबद्दल वकील संघाचे वतीने निरोप समारंभ कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले होते.

वडवणी न्यायालयात न्यायाधीश म्हणून २०२२ ते २०२५ पर्यंत तीन वर्षी कार्य काळात ज्ञानदानाचे काम पाहणारे माननीय न्यायाधीश डी एम हिंग्लजकर साहेब यांचा प्रशासकीय कार्यकाळ पूर्ण झाल्याने बदली झाली असून यानिमित्त वकील संघ वडवणीच्या वतीने न्यायालयात सभागृहात निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वकील




संघाचे अध्यक्ष अँड टि.ए.शेख,तर प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी वकील चंदेल साहेब ,उपाध्यक्ष खताळ साहेब हे होते यावेळी वकील संघाच्या वतीने शाल ,श्रीफळ, पुष्पगुच्छ व कंकालेश्वर मंदिराची प्रतिमा व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला यावेळी वकील संघाचे अँड व्ही.के.जाधव, अँड टि.ए.आडे , अँड.बी.के.तिडके, अँड पि के तिडके,अँड.एस.ए.लंगे, अँड.चंदेल, अँड.शेख इत्यादीनी मनोगते व्यक्त केली तसेच मा.न्यायाधीश हिंग्लजकर साहेब यांनी सत्कार सोहळ्याला उत्तर देताना ते म्हणाले कि वडवणी वकील संघ हा चांगला असुन याठिकाणी मला चांगले काम करण्यासाठी वकील संघाने सहकार्य केले तसेच मी न्यायदानाचे काम करत असताना कसलाही भेदभाव केला नाही तरी वकील संघाने माझा केलेला सत्कार सन्मान हा मी कधीही विसरणार नाही असे ते म्हणाले यावेळी वकील संघाचे सर्व पदाधिकारी, वकील बांधव, कर्मचारी उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड.एस.पी.डोंबाळे यांनी केले तर आभारप्रदर्शन अँड.बी.डी.उजगरे यांनी मानले.



# सौ.के.एस.के (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांची जैवविविधता वन उद्यानाला भेट व प्लास्टिक मुक्त वन अभियान

**प्रतिनिधी @ बीड**

सौ.के.एस.के (काकू) कृषी महाविद्यालय, बीड येथील पर्यावरण विज्ञान व आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वनउद्यान, श्री क्षेत्र नारायण गड,बीड येथे वन व वन जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वन जैवविविधतेचे महत्त्व समजून घेतले प्लास्टिक मुक्त वन अभियाना अंतर्गत उद्यानातून प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छतेचा संदेश दिला.

विद्यार्थ्यांनी जैवविविधता वन उद्यानातील विविध वनस्पती आणि प्राणी प्रजातीचा अभ्यास केला. वनाचे संरक्षण करणे का आवश्यक आहे ? हे विद्यार्थ्यांनी या अभ्यासातून प्रत्यक्ष अनुभवले. सोबतच विद्यार्थ्यांनी वन जैवविविधता मोजमाप पद्धतीचे प्रात्यक्षिक घेतले.अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी उद्यानाला प्लास्टिक मुक्त करण्याचा अभियानात सक्रिय सहभाग घेतला.उद्यानातील प्लास्टिक कचरा गोळा करून त्यांनी पर्यावरणाच्या स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले. अशा अभियानामुळे प्लास्टिक प्रदूषणावर नियंत्रण मिळवता येते आणि पर्यावरण समतोल राखला जातो हा संदेश त्यांनी दिला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ.गोविंद साळुंके, प्राचार्य डॉ.एस.पी.मोरे व पर्यावरण विभागातील डॉ. राऊत सर, सौ.मुटकुळे मॅडम आणि इतर सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले या भेटीमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळाले नाही तर पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्वही त्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले.

# बेघरांचे आश्रयस्थान- 'जिव्हाळा' ला सिनेकलावंत डॉ महेशकुमार वनवे यांचा आर्थिक मदतीचा हात

**प्रतिनिधी @ बीड**

बेघर-वंचित-असहाय्य-निष्काशित -अशा सर्वच वयोगटातील निराधारांचे निवारा-आश्रयस्थान असलेले,बीड शहरातील भाजी-मंडईस्थित 'जिव्हाळा' या केंद्रात 'वामा-लढाई सन्मानाची' या मराठी चित्रपटाचे प्रमुख कलाकार बीड जिल्ह्याचे सुपुत्र डॉ महेशकुमार वनवे यांनी बालकांना कपडे व सर्वांना गोड-धोड जेवणासाठी आर्थिक मदत संचालक राजू वंजारे यांचेकडे लगेच दिली.

या बाबत अधिक माहिती अशी की,'जिव्हाळा' केंद्राने सिने कलावंत डॉ महेशकुमार वनवे यांचा सत्कार व राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते. प्रथम राजमातेस निमंत्रितांनी विनम्रपणे अभिवादन केले. काकडहिरा गावच्या आदर्श सरपंच प्रिती बागलाने, छाया सरोदे, माया चव्हाण यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष




सामाजिक कार्यकर्ते डॉ संजय तांदळे यांनी प्रमाणपत्र देवुन महेशकुमार वनवे यांचा सन्मान केला. तत्कालीन प्रथेप्रमाणे सती न जाता, अहिल्यादेवीने शौर्य-कर्तबगारी-जबाबदारी ने २९ वर्ष लोककल्याण कारी राज्यकारभार केल्याचे,आपल्या मनोगता मधून प्राचार्य डी जी तांदळे यांनी मांडणी केली. से नि मुख्याध्यापक मस्के यांनी काव्य गायनाविष्कार सुंदर प्रस्तुत केला. वर्तमान व्यवस्थेत पुष्कळ जन आपल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक वेदना, दु:ख, दैना झेलत असल्याचे ऐकून-पाहून महेशकुमार भावविवश झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डी जी तांदळे, तर प्रमुख अतिथी सरपंच प्रिती बागलाने, से निअभियंता कांचन गायकवाड, सौ. गायकवाड, बीड शहर बचाव मंच चे निमंत्रक नितीन जायभाये,मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचलन केंद्राचे संचालक राजू वंजारे यांनी तर निमंत्रितांचे आभार दुसरे संचालक अभिजित वैद्य यांनी मानले .



# श्री कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्ट कार्यालयाचे थाटात उद्धाटन

**प्रतिनिधी @ बीड**

बीड तालुक्यातील ओम चैतन्य कानिफनाथ गड मांडवी संचलित, या चारिटेबल संस्थेच्या कार्यालयाचे उद्धाटन बीड तालुक्यातील जरुड या ठिकाणी ह.भ.प. संदीपान महाराज हसेगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरुवार दि.२२ मे रोजी सकाळी ११ वाजता अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता निमित्ताने श्री कानिफनाथ चॅरिटेबल संस्थेचे कार्यालयाचे उद्धाटन यावेळी करण्यात आले. यावेळी स्वामी भारती महाराज म्हणाले की, श्री कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. परंपरागत चालत आलेल्या संस्थेच्या कार्यक्रम आम्ही राबवणार असून शहीद अर्जुन काकडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ध्यानमंदिर बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अर्जुन काकडे यांनी सांगितले. या कार्यालयाच्या उद्धाटनाला कानिफनाथ चॅरिटेबल ट्रस्टची कार्यकारिणी अध्यक्ष स्वामी रामानंद भारती, साध्वी देशमुख संचालिका, स्वाध्वी भारती, या संस्थेचे सचिव अर्जुन भीमराव काकडे,गोरख महाराज गंगावणे, माजी सरपंच मच्छिंद्र शिंदे, संस्थापक अध्यक्ष रामानंद भारती, काशिनाथ काकडे परिसरातील नागरिक आणि कार्यालयाचे उद्धाटक ह.भ.प. संदीपान महाराज हासेगावकर यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्धाटन धार्मिक सोहळ्याच्या पद्धतीने पार पाडले.